# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.१२९१४/२१/अ.क्र.५८११/२४**

श्री.दिलीप पुंडलिक शिंदे

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक आमदार निवास,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय, प्रेसिडेन्सी १ ला मजला,
बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक आमदार निवास
सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय, प्रेसिडेन्सी १ ला मजला,
बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७-११-२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित. ट्रॅक रिपोर्टप्रमाणे नोटीस ०१.११.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २८-०५-२०२१ | -- | १३-०७-२०२१ | -- |

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.२८-०५-२०२१ नुसार सन २०१८ ते २०२१ या कालावधीतील आमदार निवास इमारतीच्या देखभाल दुरुस्ती विषयक माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्यामुळे अपिलकर्तांनी प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारींचे आदेश अभिलेखात उपलब्ध नाहीत.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.२५-०९-२०२१ नुसार जन माहिती अधिकारींनी माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता उपस्थित आहेत.

# क्र. मुमाआ/नों.क्र.१२९१४/२१/अ.क्र.५८११/२४



सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारींनी दि.०६-११-२०२४ चे खालीलप्रमाणे निवेदन सादर केले आहे.

राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने श्री. दिलीप पुंडलिक शिंदे यांनी अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्ज हा (कोविड-१९) कालावधीतील असल्याने व ही व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले होते. त्याअनुषंगाने या कार्यालयाकडून त्यांना दुरध्वनीद्वारे कळवून माहिती उपलब्ध आहे असे सांगण्यात आले होते. ते स्वतः कार्यालयात येवून माहिती पाहून समाधान झाले असे सांगून निघून गेले. तथापि त्यांनी द्वितीय अपिल करुन माहिती व अपील केले नसल्याबाबत तक्रार केली.

सदर अर्जदारास दुरध्वनीद्वारे संपर्क साधला असता ते दि.२०/०३/२०२४ रोजी या कार्यालयात उपस्थित झाले व सदर अर्जासंबंधित माहिती निदर्शनास आणून दिली असतां त्यांनी माहितीचे अवलोकन करुन त्यांचे समाधान झाले. सदर अर्जा विषयी त्यांची काहीही तक्रार नसल्याचे लेखी निवेदन त्यांनी या कार्यालयास सादर केलेले आहे. हे आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

अपिलकर्तांनी दि.२०-०३-२०२४ अन्वये लिहून दिले आहे की, त्यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले व त्यांचे समाधान झाले. त्यांची काहीही तक्रार नाही. सबब, अपिल निकाली काढण्यात येत आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

७-११-२०२४

( डॉ.प्रदीप व्यास )
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०७-११-२०२४**